१५३१५
१५६५


महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
कृषि संचालक (आत्मा) यांचे कार्यालय
(नैसर्गिक/सेंद्रिय शेती कक्ष)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
ईमेल - mahaorganicpune@gmail.com


ईमेल व्दारा रवाना

जा.क्र./कृआ/पीकेव्हीवाय/मा.सु/२०२३-२४/२२०७३/२०२३
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक :- ४ .०७. २०२३

प्रति ,

प्रकल्प संचालक (आत्मा)

--------------------- (सर्व जिल्हे)

विषय :- परंपरागत कृषि विकास योज्ना वर्ष २०२३ - २४ मधील ८५० गटांसाठी मार्गदर्शक सूचना...

संदर्भ :- कृ. आ. चे पत्र क्र. पीकेव्हीवाय/लक्षांक /१४५३५/२०२३ दिनांक २७ एप्रिल, २०२३

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२३-२४ मध्ये स्थापन करावयाच्या ८५० गट स्थापन करणेसाठी प्रति जिल्हा २५ गटांचा लक्षांक देण्यात आला होता. सदर ८५० गटांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेसाठी वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ मध्ये परंपरागत कृषि विकास योजना राबविण्यासाठी घटक निहाय / बाब निहाय सविस्तर मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात आलेल्या आहेत. मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

(दशरथ तांभाळे)
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, पुणे

प्रत -

१) प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन. अकोला

२) विभागिय कृषि सहसंचालक (सर्व ) -

२/- यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव



Scanned with OKEN Scanner

# मार्गदर्शक सुचना

## केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२३-२४ अंतर्गत नवीन ८५० गटासाठी मार्गदर्शक सूचना

केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२३-२४ अंतर्गत नवीन ८५० गटांची स्थापना करुन त्याची अंमलबजावणी वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या तीन वर्षामध्ये करावयाची आहे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कृआ/पीकेव्हीव्हाय/लक्षांक/१४५३५/२०२३ दि. २७ एप्रिल, २०२३ नुसार लगेच करावयाच्या कामाबाबत अंतरीम सूचना देण्यात आल्या होत्या. त्याच बाबत आता सविस्तर सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. **प्रति जिल्हा लक्षांक-** राज्यातील सर्व जिल्हयांसाठी प्रति गट २० हेक्टर याप्रमाणे एकूण २५ गटांचे लक्षांक देण्यात आलेले आहे. म्हणजेच एकूण अनुदानीत क्षेत्र ५०० हे. असेल.

२. **तालुक्यांची निवड-** शक्यतो वर्ष २०२२-२३ मध्ये ज्या तालुक्यात परंपरागत कृषि विकास योजना राबविण्यात येत आहे तो तालुका वगळून एका लगतच्या तालुक्यात किंवा लगतच्या दोन तालुक्यात गटांची स्थापना करून योजना राबवावी.

३. **गावांची निवड -** ज्या गावात यापूर्वी सेंद्रिय शेतीबाबत जागरुकता आहे किंवा किमान काही शेतकरी सेंद्रिय शेती पध्दतीचा अवलंब करतात अशी गावे प्राथम्याने निवडावीत. अशी गावे उपलब्ध नसल्यास सेंद्रिय शेतीबाबत कृषि सहाय्यक व बीटीएम यांचेमार्फत गावात योजनेची माहिती देऊन जागरुकता निर्माण करावी आणि सेंद्रिय शेतीसाठी उत्सुक असलेल्या गावांची निवड करावी. शक्यतो भौगोलिक दृष्ट्या सलग क्षेत्र असलेली गावे निवडावी.

४. **शेतकऱ्यांची निवड -** योजनेत प्रती शेतकरी एक हे. च्या मर्यादेत अनुदान देय राहील. योजनेत सहभागी शेतकऱ्याना सेंद्रिय प्रमाणीकरणासाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते, औषधे इ. चा वापर करता येणार नाही, तसेच प्रमाणीकरणासाठी आवश्यक शेती पद्धतीचा स्वेच्छेने अवलंब केला पाहिजे ही बाब समजावुन सांगावी. तसेच सेंद्रिय शेतीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून देऊन जे शेतकरी अशी शेती करण्यास तयार होतील त्याच शेतकऱ्यांचा गटात सहभाग करावा. यापूर्वीच सेंद्रिय शेतीबद्दल जागृत असलेल्या शेतकऱ्यांचा योजनेत प्राथम्याने सहभाग करावा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील त्या त्या जिल्ह्यातील या प्रवार्गाच्या शेतकऱ्यांच्या प्रमाणात शेतकऱ्यांची योजनेसाठी गटामध्ये निवड होईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देवून किमान ३० टक्के पर्यंत महिलांचा योजनेत सहभाग राहील असे पहावे.

५. **गटांची स्थापना -** वरीलप्रमाणे निवडलेल्या गावात प्रती गाव किमान एक किंवा त्याहून अधिक गट स्थापन करता येतील. सदर गट हे प्रत्येकी २० हे. क्षेत्राचे असावेत. एका गटात २० हे. पेक्षा अधिक क्षेत्र असल्यास अनुदानाचा लाभ फक्त २० हे. च्या मर्यादेत मिळेल, परंतु सेंद्रिय प्रमाणीकरणासाठी अधिकच्या क्षेत्राची नोंदणी करता येईल. अशा रीतीने प्रत्येक जिल्ह्यात २५ गटांची स्थापना करून त्या गटांची आत्मा यंत्रणेकडे नोंदणी करावी आणि प्रत्येक गटाचे राष्ट्रियकृत बँकेत खाते उघडावे.

६. **शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना -** वरीलप्रमाणे निवडलेल्या २५ गटांचे एकत्रीकरण करून त्यांची एक स्वतंत्र नवीन कंपनी स्थापन करावी किंवा अस्तित्वात असलेल्या कंपनीतील शेतक-यांचे गट करता येतील किंवा नव्याने स्थापन केलेल्या गटांचा समावेश अस्तित्वात असलेल्या कंपनीत करावा. अस्तित्वात असलेल्या कंपनीमार्फत योजना राबवावयाची असल्यास सर्व २५ गटातील शेतकरी त्या कंपनीचे भागधारक असणे आवश्यक आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या कंपनीच्या शेतकऱ्यामधूनही वरीलप्रमाणे २५ गट स्थापन करता येतील.

उपरोक्तप्रमाणे संस्थात्मक संरचना (Institutional Arrangement) करून योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे, आणि या संस्थात्मक संरचनेसाठी प्रत्येक स्थरावर योजनेतून वेगवेगळ्या घटकांच्या माध्यमातून अनुदान देणे अपेक्षित आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये सर्व घटकांची मिळुन प्रती हे. खर्चाची मर्यादा रु. ५०,०००/- इतकी होती तथापि वर्ष २०२३-२४ मध्ये त्यात कपात करून आता ती रु. ३१,५००/- करण्यात आलेली आहे. या मर्यादेत सर्व घटक तीन वर्षात राबविणे अपेक्षित आहे. घटक/बाबनिहाय अनुदान मर्यादा व ती राबविण्याची पद्धत खालीलप्रमाणे राहील.

१. मुल्य साखळीचा **संस्थात्मक** विकास (Value Chain Institutional Development) -

**बाब क्र. १.१ - क्लस्टर निर्मिती आणि क्षमता निर्माण करणे, क्षेत्रीय भेटी/ क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण** (Cluster Formation & Capacity Building Including Exposure Visit & Trainings of Field Functionaries)

| स्तर | प्रशिक्षणासाठी वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| प्रति हेक्टर | ४५०० | १५०० | १५०० | १५०० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ९०,००० | ३०,००० | ३०,००० | ३०,००० |
| प्रति समुह (२५ गटांचे ५०० हे.) | २२,५०,००० | ७,५०,००० | ७,५०,००० | ७,५०,००० |

या बाबींतर्गत वरीलप्रमाणे प्रति हेक्टर प्रति वर्ष रू. १,५००/- प्रमाणे तीन वर्षासाठी रू. ४,५००/- आणि प्रति गट प्रति वर्ष रू. ३०,०००/- प्रमाणे तीन वर्षासाठी एकुण रू. ९०,०००/- व प्रति ५०० हेक्टरच्या एका समुहासाठी (२५ गट) प्रति वर्ष रू. ७,५०,०००/- असे एकुण तीन वर्षासाठी रू. २२,५०,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे.

या तरतुदीतून बीटीएम, एटीएम, तज्ञ प्रशिक्षक, अंतर्गत नियंत्रण निरीक्षक, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक व शेतकरी यांचे प्रशिक्षण घ्यावयाचे आहेत आणि **त्याचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट -१ मध्ये देण्यात आलेला आहे.**

**शेतकरी प्रशिक्षण -**

गावपातळीवर शेतक-यांचे प्रशिक्षण घेण्याची जबाबदारी संबंधित प्रशिक्षित बीटीएम/एटीएम व मास्टर ट्रेनर यांची राहील. एका शेतक-याला एका वर्षात एकदिवसीय ५ प्रशिक्षणे द्यावयाची आहेत. एका सत्रात २० हे. च्या एकूण ५ गटातील शेतकऱ्यांचे प्रशिक्षण एकत्रित घ्यावे. त्याकरीता एका गटासाठी एका प्रशिक्षणासाठी प्रति हेक्टर रू. २५० प्रमाणे एकुण रू. ५०००/- उपलब्ध होतील. एका प्रशिक्षण सत्रात ५ गटांच्या एकुण १०० हे. क्षेत्रातील शेतक-यांचे एकावेळी प्रशिक्षण घ्यावे. अशारीतीने १०० हे. च्या (५ गटांच्या) एका प्रशिक्षण सत्रासाठी रु. २५,०००/- उपलब्ध होतील.

जिल्ह्यात एकुण उपलब्ध होणा-या रू. ६,२५,०००/- इतक्या तरतुदितुन वर नमुद केल्याप्रमाणे प्रति प्रशिक्षण सत्र रू. २५०००/- खर्च करून एकुण २५ प्रशिक्षण सत्र घ्यावे लागतील.

**गावपातळीवरील शेतकरी प्रशिक्षण खर्चाच्या बाबी**

i. अल्पोपहार, भोजन व्यवस्था,
ii. प्रशिक्षण सुविधा, हॉल भाडे, ध्वनीक्षेपण, एलसीडी प्रोजेक्टर भाडे
iii. प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक साहित्य
iv. आवश्यकता भासल्यास शेतकऱ्यांचा प्रवास खर्च (गट वेगवेगळ्या दुरच्या गावात असल्यासच)
v. इतर आनुषंगीक बाबी

वर्ष २०२३-२४, २०२४-२५, व २०२५-२६ मध्ये वरीलप्रमाणे प्रत्येक वर्षी घ्यावयाच्या पाच प्रशिक्षणाचा कालावधी व विषय खालीलप्रमाणे असतील.

**पहिले प्रशिक्षण**- हे प्रशिक्षण खरीप हंगामपूर्व मे/जुन महिन्यात पेरणीपुर्वी प्रशिक्षण घेण्यात यावे व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा. यामध्ये योजनेची व सेंद्रिय शेतीची संकल्पना, उद्देश आणि कार्यपध्दती विषद करावी, या योजनेतुन समूहस्तरावर स्थापन करावयाच्या एफपीओबाबत संकल्पना व कार्यपध्दती, पिक नियोजन, सापळा पिके, बिजप्रक्रीया, आंतरपिक लागवड, मुलस्थानी जलसंधारण, माती व पाणी परीक्षणाचे महत्व, स्वनिर्मित निविष्ठा उत्पादन व वापर, पिक अवशेषांचे कंपोस्ट करणे इ. बाबत प्रात्यक्षिकासह माहीती द्यावी. या प्रशिक्षणात शेतकरी दैनंदिनी वितरीत करावी व त्यात घ्यावयाच्या नोंदीचे महत्व स्पष्ट करून सांगावे.

**दुसरे प्रशिक्षण**- हे प्रशिक्षण खरीप मध्य हंगामात जुलै/ऑगस्ट महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा. सेंद्रिय शेती पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर, तण नियंत्रण, कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे, पक्षीथांबे ई. चा वापर, जमिनीत सुक्ष्मजीवाणुचा वापर, सेंद्रिय प्रमाणीकरण कार्यपध्दती, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडा इ. विषयांचा प्रशिक्षणात समावेश करावा.

**तिसरे प्रशिक्षण**- हे प्रशिक्षण सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा. स्वनिर्मित सेंद्रिय पध्दतीची पिक वृध्दीवर्धके (PGR) (उदा. मत्स्यजनीत व अंडेजनीत ॲमीनो ॲसीड, पंचगव्ये इ.) शेतातील किड व रोग निरीक्षण व सर्वेक्षण, सेंद्रिय प्रमाणीकरण मानके, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, पुढील हंगामाची पूर्व तयारी व नियोजन करणे.

**चौथे प्रशिक्षण**- हे प्रशिक्षण नोव्हेंबर/ डिसेंबर महिन्यात मध्ये घेण्यात यावे व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा. सेंद्रिय पध्दतीचे काढणी पश्चात तंत्रज्ञान, साठवणूक, मालाची प्रतवारी, विपणन व्यवस्थापन, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडयानुसार विपणनासाठी असलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानके इ.

**पाचवे प्रशिक्षण**- हे प्रशिक्षण जानेवारी/फेब्रुवारी महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा. शेतकरी उत्पादक कंपनी व गटांचे ऑडीट, अभिलेख व्यवस्थापन, सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेल्या त्रुटींची पूर्तता व करावयाच्या सुधारणा, पॅकेजिंग व ब्रँडींग, शेतकरी उत्पादक कंपनीसाठी असलेल्या शासकीय योजना व त्याचे अभिसरण इ.

वरील प्रशिक्षणाबाबत नियोजन करताना स्थानिक परिस्थितीनुसार व गरजेनुसार व कार्यक्रमाच्या कालावधीमधिल वर्षनिहाय विषयामध्ये बदल करून अद्यावत तांत्रिक माहीतीचा प्रशिक्षणामध्ये समावेश करावा. प्रशिक्षणाचे पूर्व नियोजन प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावे.

**बाब क्र. १.२ - मनुष्यबळाची नेमणूक आणि योजना अंमलबजावणी तसेच डेटा व्यवस्थापन** (Deployment of Manpower & Management Cost For Implementation of Programme Including Data Management & Uploading) -

या बाबीतुन उपलब्ध होणा-या तरतुदीतुन सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि डेटा व्यवस्थापन (MIS) इ. साठी खर्च करावयाचा आहे.

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| प्रति हेक्टर | ४५०० | १५०० | १५०० | १५०० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ९०,००० | ३०,००० | ३०,००० | ३०,००० |
| प्रति समुह (२५ गटांचे ५०० हे.) | २२,५०,००० | ७,५०,००० | ७,५०,००० | ७,५०,००० |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रति हेक्टरी रू. ४,५००/- तीन वर्षासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. प्रतिवर्षी प्रति हेक्टर रू. १,५००/- तरतुद उपलब्ध आहे.

**याबाबीतून उपलब्ध होणारी तरतूद खालील घटकासाठी खर्च करावी-**

| अ.क्र. | घटक | अंमलबजावणी वर्ष | खर्चाचे मापदंड | शेरा |
|---|---|---|---|---|
| अ | अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची (ICS Inspector) नेमणुक व मानधन | २०२३-२४<br>२०२४-२५<br>२०२५-२६ | प्रति महा रु.६५००/- प्रति निरीक्षक<br>(रू.६५००/- ची विगतवारी - मानधन रु. ५,०००/- + स्थानिक प्रवास खर्च रु.१०००/- +<br>मोबाईल डेटा रु.५००/-) | सरासरी ३ गटांकरिता एक याप्रमाणे एका जिल्ह्यात एकुण ८ अंतर्गत नियंत्रण निरीक्षक नेमावेत. |

**अ) अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) नेमणुक प्रक्रीया -**

या घटकाअंतर्गत ३ गटांकरिता एक याप्रमाणे "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) नेमावयाचा आहे. अशारीतीने एका समुहात एकुण ८ "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) यांची नेमणुक करावयाची आहे. या नेमणुका योजनेंतर्गत स्थापन करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत करणे अभिप्रेत आहे म्हणुन समूहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करण्याचे काम प्राधान्याने त्वरीत पुर्ण करावे. सेंद्रिय प्रमाणिकरणासाठीचा अर्ज शेतकरी उत्पादक कंपनीने "अपेडा" मान्यताप्राप्त राज्यस्तरावरून निश्चित केलेल्या प्रमाणिकरण यंत्रणेकडे करावयाचा असल्यानेही शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीची कार्यवाही दि. ३१ जुलै, २०२३ पर्यंत पुर्ण करून नियुक्त प्रमाणिकरण यंत्रणेकडे प्रमाणिकरणाबाबत अर्ज सादर करावा.

शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करण्यासाठी योजनेंतर्गत **"बाब क्र. ३-अ"** या घटकातुन रू. ४०,०००/- खर्च करण्याची तरतुद आहे. याबाबत पुढे सविस्तर माहिती **"बाब क्र. ३-अ"** या घटकाबाबतच्या विवेचनात दिलेली आहे.

**अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) नेमणुकी संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**

**नेमणूक कोणी करावी-** "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांची निवड ही शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत संबंधित प्रकल्प संचालक, आत्मा यांचे मान्यतेने करण्यात यावी.

- शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत येणाऱ्या सर्व "अंतर्गत नियंत्रण निरीक्षकांवर" दैनंदिन कामकाजासाठी तज्ञ प्रशिक्षक व बीटीएम/एटीएम यांचे नियंत्रण राहील.

**पात्रता निकष-** निवड करताना कृषि पदविधर किंवा कृषि पदविकाधारक यांना प्राधान्य द्यावे. तसेच ते उपलब्ध न झाल्यास कोणत्याही शाखेचा पदविधर चालेल, तोही न मिळाल्यास किमान १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष उमेदवार चालेल. नेमणुकीमध्ये कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

**नेमणूक केंव्हापासून व मानधन-** शेतकऱ्यांच्या शेतावरील उत्पादनाच्या प्रमाणिकरणासाठी "अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची" नेमणुक दि. १,ऑगस्ट २०२३ पुर्वी करावी आणि त्यांना दि. १,ऑगस्ट २०२३ पासुन मानधन प्रति महा रु. ५,०००/-, स्थानिक प्रवास खर्च प्रति महा रु. १,०००/- व मोबाईल डेटा प्रति महा रु. ५००/- असे एकूण प्रति महा रु. ६,५००/- प्रमाणे रक्कम देय राहील.

- "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांना प्रती महा वरीलप्रमाणे मानधन योजनेअंतर्गत उपलब्ध निधीमधून अदा करण्यात यावे. (एका समुहाच्या ८ अंतर्गत नियंत्रण निरीक्षकासाठी एका वर्षासाठी रक्कम रू. ६,५०० x ८ x १२ = रू. ६,२४,०००/-).

**कालावधी-** "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांची निवड ही मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात योजना कालावधीपुरती जास्तीत जास्त तीन वर्षे करण्यात यावी. याकरिता सदर घटकांतर्गत प्रति समुह रु. ६.२४ लाख प्रति वर्ष याप्रमाणे तीन वर्षासाठी तरतूद उपलब्ध आहे. कामकाजात सातत्य नसणाऱ्या, अपेक्षेप्रमाणे जबाबदाऱ्या पार न पाडणाऱ्या अंतर्गत नियंत्रण निरीक्षकास नोटीस देऊन कामात सुधारणा करण्याची संधी द्यावी आणि त्याउपरही सुधारणा न झाल्यास त्यांचे मानधन देणे त्वरीत थांबवून त्यांची नेमणूक शेतकरी उत्पादक कंपनीने रद्द करावी. प्रकल्प संचालक, आत्मा यांनाही याबाबत शेतकरी उत्पादक कंपनीला सूचना देण्याचे अधिकार असतील व अपेक्षेप्रमाणे काम न करणाऱ्या निरीक्षकांचे मानधन थांबविण्याचे अधिकार असतील. नेमणूक रद्द केलेल्या निरीक्षकांऐवजी नवीन निरीक्षकाची नेमणूक शेतकरी उत्पादक कंपनी यांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मान्यतेने करावी.

**अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांची जबाबदारी-**

**प्रत्येक अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाने त्याला ज्या तीन गटांसाठी नेमले आहे त्या गटातील शेतकऱ्यांसाठी पुढीलप्रमाणे कामे करावीत -**

- शेतकऱ्यांना प्रमाणीकरण मानकांबाबत मार्गदर्शन करणे आणि त्यानुसार त्याचे पालन होत असल्याबाबत त्याची खात्री करणे.
- गटातील सर्व शेतकऱ्यांनी प्रमाणीकरणासाठी आवश्यक दैनंदिनी मध्ये नोंदी घेतल्याची खात्री करणे. प्रमाणीकरणासाठी तपासणी/निरीक्षण करणे, गटातील शेतकऱ्यांचे अहवाल कंपनीस्तरावरील प्रमाणीकरण समितीकडे देणे, ट्रेसनेट प्रणालीवर सदरचे अहवाल नोंदविणे.
- गटांचा पिक पेरा, पिकपद्धती, उत्पादित माल, आवक, प्रतवारी व इतर अनुषंगीक बाबीची माहिती देणे.

वरीलप्रमाणे सर्व जबाबदारी योग्यरित्या पार पाडण्याकरिता उपरोक्त कामांव्यतिरिक्त शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर **प्रमाणिकरण, विपणन, प्रापण, लेखा व प्रशासन आणि भांडारण** याप्रमाणे समिती स्थापन करण्यात याव्यात आणि प्रत्येक समितीवर अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची नेमणूक करावी. ज्या समितीत जो अंतर्गत नियंत्रण निरीक्षक आहे त्यांनी त्या समितीत समन्वयकाचे काम करावे.

## समुहस्तरावर/शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर स्थापन करावयाच्या समित्या

**१. प्रमाणिकरण २. विपणन ३. प्रापण ४. लेखा व प्रशासन ५.भांडारण**

उपरोक्त समित्यांची रचना व कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल.

**१. प्रमाणिकरण समिती**

**अ. अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

**आ. सदस्य -**

i. शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष,
ii. शेतकरी उत्पादक कंपनीचे उपाध्यक्ष,
iii. शेतकरी उत्पादक कंपनीचे सचिव
iv. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-६
v. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-१ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

**इ. कार्य व जवाबदारी**

i. प्रमाणिकरणसाठी अर्ज करणे
ii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांच्याकडून गटाचे अंतर्गत निरीक्षण करून घेणे
iii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षकांच्या अहवालावर निर्णय घेवून शेतकरी व गट बाद करणे
iv. नवीन सदस्यांना मान्यता देणे
v. Trace net प्रणालीवर माहिती भरणे
vi. सर्व गटांना अंतर्गत नियंत्रण प्रणाली मापदंड उपलब्ध करून देणे व प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना शेती दैनंदिनी उपलब्ध करून देणे
vii. प्रत्येक वर्षी प्रमाणिकरणाचे नुतनीकरण करणे
viii. प्रमाणिकरण विषयक सर्व कामकाज पाहणे

**२. विपणन समिती**

**अ. अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

**आ. सदस्य**

i. दोन किंवा तीन संचालक
ii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक - ७
iii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-२ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

**इ. कार्य व जबाबदारी**

i. सेंद्रिय माल विक्री केंद्राचे कामकाज शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने पाहणे
ii. इतर शेतकरी उत्पादक कंपनींच्या संपर्कात राहून त्यांच्या मागणीप्रमाणे शेत मालाचा पुरवठा करणे
iii. वाहतुकीची व्यवस्था करणे

iv. उत्पादित होणाऱ्या मालाची माहिती ठेवणे.

**३. प्रापण समिती :**

**अ. अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

आ. सदस्य

i. दोन किंवा तीन संचालक
ii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक -८
iii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-३ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

इ. कार्य व जबाबदारी

i. शेतकऱ्यांचा माल विकत घेणे व त्यासाठी सर्व व्यवस्था करणे
ii. शेतकऱ्यांच्या मालाची गुणवत्ता तपासणे
iii. ग्रेड निहाय मालाची किंमत निश्चित करणे
iv. मालाचे नमुना (Sample) काढून तपासणी साठी प्रयोगशाळेत पाठविणे
v. खरेदी केलेल्या मालाची माहिती भांडारण समिती व लेखा समितीला देणे

**४. लेखा व प्रशासन समिती**

**अ. अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

**आ. सदस्य**

i. दोन किंवा तीन संचालक
ii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-४ हा या समितीचा सदस्य सचिव असेल व तो कंपनीचे प्रशासकीय कामकाज पाहिल व लेखाविषयक हिशेब ठेवेल

**इ. कार्य व जबाबदारी**

i. शेतकरी उत्पादक कंपनीचे लेखाविषयक सर्व कामकाज पाहणे.
ii. खरेदी केलेल्या मालाचे पेमेंट करणे
iii. शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रशासकीय कामकाज पाहणे
iv. शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व दस्ताऐवजांचे जतन करणे
v. शेतकरी उत्पादक कंपनीचे लेखापरीक्षण करून घेणे

**५. भांडारण समिती**

**अ. अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

**आ. सदस्य**

i. दोन किंवा तीन संचालक
ii. अंतर्गत नियंत्रण निरीक्षक-५ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

**इ. कार्य व जबाबदारी**

i. खरेदी केलेल्या मालाची व्यवस्थित ग्रेड निहाय साठवणूक करणे
ii. साठवणूक केलेल्या मालाच्या नोंदी ठेवणे
iii. साठवणुकीच्या वेळेस माल खराब होणार नाही यासाठीची सर्व व्यवस्था करणे
iv. साठवणूक केलेल्या मालाची माहिती विपणन समितीला देणे
v. मालाचा चढ उतार करणेसाठीची व्यवस्था करणे
vi. मालाची स्वच्छता व प्रतवारी करणे

**ब) डेटा व्यवस्थापनासाठी MIS विकसित करुन त्याची अंमलबजावणी करणे -**

या बाबीतील अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाच्या मानधनासाठी लागणारी तरतुद वजा जाता उर्वरीत तरतुद डेटा व्यवस्थापन (MIS) इ. बाबीवर आवश्यकतेनुसार राज्यस्तरावरून खर्च करण्यात येईल. (आवश्यकता भासल्यास जिल्हास्तरावरही उपलब्ध करून देण्यात येईल)

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनमार्फत "अंतर्गत प्रोग्रामरची" नेमणुक करून शेतकरीस्तर ते शासनस्तरापर्यंत अहवाल प्राप्त होईल अशा पध्दतीने माहीती व्यवस्थापन प्रणाली (MIS) विकसित करावी. सदर प्रणालीत माहीती भरण्यासाठी विविधस्तरावर डॅशबोर्ड, जिओ टॅगिंग, जिओ फेन्सिंग व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश असावा. यासाठी येणारा खर्च बाब ए-२ मधून करण्यात येईल.

**२. मुल्यसाखळी विकसित करणे** (Value Chain Production)

**बाब क्र. २.१ -: सेंद्रिय प्रमाणिकरण** (NPOP Certification) -

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तीसरे वर्ष |
| प्रति हेक्टर | ३,००० | १,००० | १,००० | १,००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ६०,००० | २०,००० | २०,००० | २०,००० |
| प्रति समुह (२५ गटांचे ५०० हे.) | १५,००,००० | ५,००,००० | ५,००,००० | ५,००,००० |

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार योजनेअंतर्गत बी-१ घटकांतर्गत पीजीएस-इंडिया पध्दतीने सेंद्रिय प्रमाणिकरण करणेसाठी तरतूद उपलब्ध आहे. तथापि, National Programme for Organic Production (NPOP) अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरणाचा पर्यायही राज्यास उपलब्ध आहे. पीजीएस-इंडिया पध्दतीने उत्पादीत सेंद्रिय प्रमाणित शेतमाल विक्रीस विश्वासार्हतेच्या अभावी अडचणी येतात व मागणी कमी राहते. सद्यस्थितीत देशांतर्गत तसेच आंतराराष्ट्रीय बाजारपेठेत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणित केलेल्या उत्पादनांना मोठया प्रमाणात मागणी आहे. ही बाब लक्षात घेऊन योजनेंतर्गत प्रस्तावित क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण अपेडा मान्यता प्राप्त National Programme for Organic Production (NPOP) अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण आयसीएस पध्दतीने करावयाचे आहे.

रासायनिक शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागतो. योजनेअंतर्गत तीन वर्षे प्रमाणिकरणाचे सी-१, सी-२ व सी-३ प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

**प्रमाणीकरणाच्या कार्यवाहीबाबतचा तपशिल -**

**अ) NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण**

**ब) तज्ञ प्रशिक्षक**

**अ) NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण-**

योजनेंतर्गत प्रस्तावित क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण अपेडा मान्यता प्राप्त NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण आयसीएस पध्दतीने करण्यात येईल. समुहस्तरावर स्थापित झालेली शेतकरी उत्पादक कंपनी ही "अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS)" म्हणुन काम करेल व प्रकल्प संचालक, आत्मा हे "MANDATOR" राहतील. सदरचे प्रमाणीकरण हे भारत सरकारच्या **APEDA (अपेडा)** मान्यताप्राप्त व राज्यस्तरावरून निवड केलेल्या संस्थेकडून करण्यात यावे. सदर प्रमाणिकरण यंत्रणेबरोबर कृषि संचालक, आत्मा हे करार करतील.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन मार्फत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण यंत्रणा नियुक्तीसाठी निविदा प्रक्रीया राबविण्यात येईल.

राज्यस्तरावरुन निवडण्यात आलेल्या प्रमाणीकरण यंत्रणेला देण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार प्रत्यक्ष काम होईल याबाबत खात्री करण्यात यावी.

**ब) तज्ञ प्रशिक्षक-**

**नेमणूक कोणी करावी-**

- कंत्राटी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक बाह्य स्त्रोताद्वारे समुह स्तरावरील शेतकरी उत्पादक कंपनीने प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मदतीने करावी.
- समुहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना होईपर्यंत कंत्राटी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावी.

**पात्रता निकष-**

तज्ञ प्रशिक्षक हा किमान कृषि पदवीधर अथवा कृषि पदविकाधारक असावा. अपवादात्मक परिस्थितीत संबंधित प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मान्यतेने सेंद्रिय शेती तज्ञ असलेल्या इतर पदविधारकाची निवड करता येईल. तज्ञ प्रशिक्षकाने समूहाच्या ठिकाणी वास्तव्यास असणे बंधनकारक असेल.

**मानधन-**

सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी अर्थसहाय्य या घटकांतर्गत "तज्ञ प्रशिक्षक" यांचे मानधन (जी.एस.टी. सह प्रति महा मानधन रू. १५०००/- + पी.टी.ए. रू. २०००/- असे एकुण रू. १७,०००/-) देय राहील. सदरचे मानधन शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत तज्ञ प्रशिक्षकाला देण्यात यावे. तथापि समूहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनींची स्थापना होईपर्यंत या मानधनाची अदायगी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावी. सदरील खर्च हा सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी अर्थसहाय्य या घटकाअंतर्गत एकुण उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहुन करण्यात यावा.

**तज्ञ प्रशिक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:-**

- गटातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती संदर्भात पिक संवर्धन, पिक संरक्षण, सेंद्रिय प्रमाणिकरण इ. प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीची (FPC) स्थापना, नोंदणी, राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करणे.
- सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक डेटा अंतर्गत नियंत्रण निरिक्षक यांचे सहकार्याने संगणकावर अद्ययावत करणे.
- अधिनस्त असलेल्या सर्व गटांचा पिक पेरणी अहवाल, उपलब्ध माल व गुणवत्ता इत्यादीची अचूक माहिती वेळोवेळी शेतकरी उत्पादक कंपनीला व जिल्हास्तरीय आत्मा कार्यालयास सादर करणे.
- सेंद्रिय प्रमाणिकणासाठी आवश्यक सर्व माहिती संबंधित यंत्रणेस व सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा यांना उपलब्ध करून देणे तसेच तृतीय पक्षिय प्रमाणीकरण यंत्रणेच्या पोर्टल वरील कार्य जसे नोंदणी, अर्ज, पिक पेरा इत्यादी अनुषंगिक बाबी वेळेत पूर्ण करणे तसेच त्रुटींची पूर्तता करणे.

- शेतकरी उत्पादक कंपनीकरिता व्यवसाय आराखडा व प्रकल्प अहवाल तयार करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या सर्व व्यवहारच्या नोंदी घेणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या सर्व संचालक मंडळातील सदस्यांची मासिक बैठका घेणे.
- तृतीय पक्षिय सेंद्रिय प्रमाणिकरण अंतर्गत प्रमाणिकरणासाठी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्तरावर अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS) वर प्रमाणिकरण संबंधित माहीती अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांचेमार्फत भरून घेणे व अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावरील प्रमाणिकरण, विपणन, प्रापण, लेखा व प्रशासन आणि भांडारण समितीचा अध्यक्ष म्हणून कार्य करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनी व प्रमाणिकरण यंत्रणा यांचेमध्ये समन्वयक म्हणुन काम पाहणे.
- प्रमाणिकरणामधिल माहीती, प्रस्ताव यांचेतील त्रुटींची पुर्तता करणे.
- समूहातील उत्पादित होणाऱ्या मालाची माहिती शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावरून अधिकाऱ्यांना देणे.
- सेंद्रिय माल विक्री केंद्र स्थापित करून विक्री सुरू करणे व त्याचे दैनंदिन कामकाज पाहण्यास सहकार्य करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर वेळोवेळी येणारे काम पार पाडणे.

**बाब क्र. २.२ : सेंद्रीय शेतीमध्ये रूपांतरण, निविष्ठा, शेतात सेंद्रिय निविष्ठा निर्मितीसाठी पायाभूत सुविधा यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान (डीबीटीद्वारा)** (Incentive to Farmers as DBT) -

| स्तर | वर्षनिहाय तरतुद (रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| प्रति हेक्टर | १५,००० | ५,००० | ५,००० | ५,००० |
| प्रति गट (२० हेक्टर) | ३,००,००० | १,००,००० | १,००,००० | १,००,००० |
| प्रति समुह (२५ गटांचे ५०० हे.) | ७५,००,००० | २५,००,००० | २५,००,००० | २५,००,००० |

केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विकास योजना अंतर्गत योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार सेंद्रिय निविष्ठा निर्मिती व वापर या घटकाकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाकरिता प्रति हेक्टर प्रति वर्ष रु. ५,०००/- याप्रमाणे तीन वर्षात एकुण रू. १५,०००/- अनुदान देय आहे.

**अ) सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजनांचा -**

उपलब्ध तरतुदितील प्रथम वर्षात प्रति हेक्टरी रू. ४०००/- द्वितीय वर्षात रू.५०००/- व तृतीय वर्षात रू. ५०००/- याप्रमाणे एकुण रू. १४०००/- परिशिष्ट क्र. २ प्रमाणे देय राहील. परिशिष्टामधील मृद नमुने तपासणी व जैविक कुंपण हे उपक्रम तिन्ही वर्षी राबविणे बंधनकारक राहील. नमुद केल्याप्रमाणे उर्वरीत बाबी (उपाययोजना) शेतावर राबवयाच्या आहेत. शेतक-याने शेतावर ज्या बाबींसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही त्याबाबींसाठी शेतक-याने त्या बाबी स्वखर्चाने राबवायच्या आहेत. प्रती शेतकरी अधिकतम क्षेत्र १ हेक्टर पर्यंत राहील.

**ब) स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करणे -**

या घटकांतर्गत तीन वर्षासाठी प्रति हेक्टर रू. १५०००/- ची तरतुद केलेली आहे. त्यापैकी सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजनांच्या बाबींसाठी वैयक्तिक शेतक-यांसाठी प्रति हेक्टर रू. १४०००/- ची तरतुद केलेली असुन उर्वरीत रू. १०००/- शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर खर्च करावयाचा

आहे. कंपनीस्तरावर एकुण रू. ५,००,०००/- ची तरतुद उपलब्ध होत आहेत. सदर तरतुदितुन स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करावयाचे आहे (१००० प्रति हेक्टरी शिल्लक X ५०० हेक्टर = ५०००००). हे केंद्र स्थापन करण्यासाठी लागणारी जागा, उपकरणे, साहित्य इ. बाबतचा तपशिल स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**<u>या तरतुदीतून वर्षनिहाय सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजनांचा तपशिल सोबत परिशिष्ट -२ प्रमाणे.</u>**

**बाब क्र. ३ - मूल्यवृद्धी, विपणन आणि प्रसिद्धी** (Value Addiation, Marketing and Publicity)

३.१: विपणनासाठी सहाय्य, सामुहिक पॅकिंग , ब्रॅडिंग , जागा ,वाहतुक इ.

३.२ एफपीसी/एफपीओ मार्फत मुल्यवृध्दी व पायाभूत सुविधा निर्मिती

३.३ ब्रॅंड तयार करणे, विक्री मेळावा, प्रदर्शन, स्थानिक प्रसिद्धी, सेंद्रीय बाजार/मेला, स्थानिक मार्केटिंग पुढाकार, राष्ट्रीय व्यापार मेळाव्यामध्ये सहभाग

उपरोक्त तीनही घटकांसाठी वर्षनिहाय एकत्रितरीत्या खालीलप्रमाणे तरतुद उपलब्ध आहे.

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| प्रति हेक्टर | ४,५०० | १,००० | १,५०० | २,००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ९०,००० | २०,००० | ३०,००० | ४०,००० |
| प्रति समुह (२५ गटांचे ५०० हे.) | २२,५०,००० | ५,००,००० | ७,५०,००० | १०,००,००० |

**उपरोक्त तरतूदीतून खालील बाबीवर खर्च करावा-**

| अ.क्र | घटक | तरतूद रु. लाख | खर्चाच्या बाबी | शेरा |
|---|---|---|---|---|
| अ | शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेसाठी सहाय्य | ०.४० | कंपनी नोंदणी शुल्क, कंपनी सेक्रेटरी शुल्क आणि अनुषंगिक खर्च | |
| ब | कंपनी भागधारक शेतकऱ्यांना कंपनीचे भाग खरेदी करण्यासाठी सहाय्य (Equity Share) | ५.०० | कंपनीचे भाग खरेदी करणेसाठी प्रति भागधारक शेतकरी प्रति हेक्टर अधिकतम रु. १,०००/- | |
| | **एकूण** | **५.४०** | -- | |

**अ. शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेसाठी सहाय्य -**

i. **शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी -**

सेंद्रिय प्रमाणिकरण करण्यासाठी या योजनेत शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे बाबत या मार्गदर्शक सुचनेत **"बाब क्र १.२-अ"** मध्ये नमुद करण्यात आले आहे. कंपनीची स्थापना विपणन व ब्रॅड निर्मीती यासाठी सुध्दा आवश्यक आहे. अशा कंपनीच्या नोंदणीसाठी रक्कम रु. ०.४० लाख पर्यंत अर्थसहाय्य या घटकातुन देण्यात यावे. या तरतुदीतुन कंपनी नोंदणीसाठीचे कंपनी सेक्रेटरीचे (CS) शुल्क आणि कंपनी स्थापन करण्यासाठी येणारा खर्च भागवावा. हा निधी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी समुहांतर्गत स्थापित एका गटाला आदा करावे आणि या गटाने कंपनी स्थापनेसाठी पुढाकार घेऊन हा खर्च करावा. बीटीएम/एटीएम आणि तज्ञ प्रशिक्षक यांनी कंपनी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या गटाला आवश्यक ती मदत करावी.

प्रमाणिकरण यंत्रणेकडे अर्ज करणे, अंतर्गत नियंत्रण निरीक्षक नेमणे इत्यादी कामांसाठी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करणे ही अत्यावश्यक बाब आहे. म्हणून कंपनीची स्थापना त्वरीत करावी. सुरुवातीला पुढाकार घेणारे कंपनी संचालक ठरवुन कंपनीची नोंदणी करावी आणि प्रमाणिकरणासाठी त्वरीत अर्ज करावा. अन्य भागधारक शेतकऱ्यांचा समावेश टप्प्या टप्प्याने करण्यास हरकत नाही.

योजनेअंतर्गत कार्यक्षेत्रात यापूर्वीच कार्यरत असलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत योजना राबविण्यात येत असल्यास **बाब क्र.३-अ** बाबीवर खर्च करण्याची आवश्यकता नाही. सदर कंपनी सेंद्रिय शेती संकल्पने अंतर्गत उत्पादन व विक्री इ.मध्ये समाविष्ट होऊ इच्छित असल्याने कंपनीने तयार केलेल्या उपविधीमध्ये (Bylaw) सेंद्रिय शेती बाबतच्या संकल्पनेचा समावेश करणे अनिवार्य राहील.

**ब. कंपनी भागधारक शेतकऱ्यांना कंपनीचे भाग खरेदी करण्यासाठी सहाय्य (Equity Share) -**

समभागसाठी (Equity Share) शेतकऱ्याने प्रति हेक्टरी रक्कम रु. १०००/- किंवा त्यापेक्षा जास्त समभाग घेतल्यास प्रति हेक्टरी जास्तीत जास्त रक्कम रु. १०००/- किंवा प्रति कंपनी जास्तीत जास्त रक्कम रु. ५.०० लाख इक्विटी शेअरसाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकरी संख्या ५०० पेक्षा जास्त असल्यास रु. ५.०० लाख मर्यादेतच शेतकऱ्यांच्या जमा होणाऱ्या शेअर्सच्या प्रमाणात इक्विटी शेअर देण्यात यावेत.

**"केंद्र पुरस्कृत १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी गठण व संवर्धन"या योजनेंतर्गत स्थापित झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या नोंदणीसाठी तसेच शेतकरी उत्पादक कंपनीकरीता इक्विटी शेअरचा लाभ देय आहे. त्यामुळे सदर योजनेंतर्गत स्थापित झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या नोंदणीला रक्कम रु.०.४० लाख तसेच शेतकरी उत्पादक कंपनीला रक्कम रु.५.०० लाख इक्विटी शेअरचा लाभ देय राहणार नाही. तसेच सदर योजनेंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करावयाची असल्याने त्याठिकाणी तज्ञ प्रशिक्षकाची नियुक्ती करण्यात येऊ नये. मुख्य कार्यकारी अधिकारीच तज्ञ प्रशिक्षकाचे कार्य करतील.**

**शेतकरी उत्पादक कंपनी** (Farmer Producer Company- FPC) :-

समूहातील सर्व गटातील सर्व शेतकरी हे शेतकरी उत्पादक कंपनीचे (FPC) चे भागधारक सभासद असतील. शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) ही गटांसाठी मार्गदर्शन केंद्र म्हणून कार्य करेल.

**शेतकरी उत्पादक कंपनीची जबाबदारी पुढीलप्रमाणे :**

- समूह संकलन केंद्रावर करावयाच्या सुविधा निश्चित करणे.
- समूह संकलन केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहणे.
- खरेदीदार सोबत विक्रीचे करार करणे व मालाच्या पुरवठ्याची हमी देणे.
- शेतकऱ्यांचा माल खरेदी करणे.
- शेतकऱ्यांचा माल खरेदी करताना मालाची गुणवत्ता तपासणे.
- शेतकऱ्यांना मालाचे पेमेंट करणे (धनादेश द्वारे गटाच्या बँक खात्यात जमा करणे).
- खरेदी केलेल्या मालाची साठवणूक करणे व साठवणूक केलेल्या मालाची निगा राखणे.
- मालाची वाहतूक व्यवस्था करणे.
- विक्री केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहणे.
- बँकेकडून वित्त पुरवठा उपलब्ध करून देणे.
- सेंद्रिय प्रमाणिकरणमध्ये अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS) म्हणून काम करणे.
- प्रत्येक महिन्याला संचालक, गट प्रवर्तक, तज्ञ प्रशिक्षक व सेवा प्रदाता संस्था यांच्या बरोबर सभा घेणे.

- खरेदीदाराच्या मागणीप्रमाणे पिकांचे नियोजन करणे.
- शेतकऱ्यांच्या व गटांच्या मागणीप्रमाणे निविष्ठांचे नियोजन करणे.
- जैविक निविष्ठा निर्मिती केंद्राची स्थापना करणे.
- अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची नेमणुक करणे.
- प्रमाणिकरण यंत्रणेकडे अर्ज करणे.

शेतकरी उत्पादक कंपनी ही तृतीय पक्षीय प्रमाणीकरण करिता अंतर्गत प्रमाणीकरण यंत्रणा (ICS) म्हणून काम करेल. समूहातील सर्व शेतकऱ्यांचे प्रमाणीकरणाची जबाबदारी ही शेतकरी उत्पादक कंपनीची राहील. अंतर्गत प्रमाणीकरण यंत्रणे अंतर्गत सर्व शेतकऱ्यांच्या प्रमाणीकरणाच्या दृष्टीने नोंदणी, पिक पेरा, पिक उत्पादन आराखडा, अंतर्गत तथा बाह्य निरीक्षणे, इत्यादी सर्व पूर्ण करण्याची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपनीची राहील.

मूल्यवृद्धी, विपणन आणि प्रसिद्धी या बाबीतुन उपलब्ध असलेल्या प्रति समुह एकूण तरतूद रु. २२.५० लाख मधून वरील बाबीसाठी (शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना) रु. ५.४० लाख वगळता उर्वरित रु. १७.१० लाख तरतूदीतून स्थापित करावयाच्या समुह संकलन केंद्र, बाजार व्यवस्था इत्यादी बाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील

**योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन-**

योजनेची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होते किंवा नाही याची तपासणी करणे. चुकीची दुरुस्ती करणे आणि अनियमितता झाल्यास त्यावर कार्यवाही करणेसाठी योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने योजनेची अंमलबजावणी सुरु असतांना नियमित सनियंत्रण (Concurrent evaluation) आणि ठराविक कालावधीमध्ये सनियंत्रण व मुल्यमापन (Periodic Monitoring & Evaluation) होणे आवश्यक आहे. त्याशिवाय योजनेचे प्रगती अहवाल नियमितपणे सादर करणे अपेक्षित आहे. त्यासाठी ऑनलाईन MIS प्रणाली डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन मार्फत विकसित करण्यात येईल आणि ऑफलाईन पाठवावयाच्या मासिक अहवालाचे प्रपत्र स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**नियमित (Concurrent) सनियंत्रण-** यासाठी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे तपासणी करावी.

| अ.क्र. | कर्मचारी/अधिकारी | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | क्षेत्रीय कर्मचारी बीटीएम | समुहातील १०० टक्के बाबी आणि प्रत्येक आठवडयात समुहाला किमान एक भेट |
| २. | प्रकल्प उपसंचालक (आत्मा) | प्रत्येक महिन्यात समुहाला एक भेट आणि किमान दोन गटांची तपासणी |
| ३. | प्रकल्प संचालक (आत्मा) | समुहाला दोन महिन्यातून एक भेट आणि किमान दोन गटांची तपासणी |
| ४. | अधिक्षक कृषि अधिकारी, विकृससं कार्यालय | तीन महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |
| ५. | प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन | प्रत्येक महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |
| ६. | विभागीय कृषि सहसंचालक | तीन महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |

प्रकल्प उपसंचालका पासून वरील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी अंती तपासणी टिपणी काढावी आणि ती आपल्या दैनंदिनी सोबत जोडावी. काही अनियमितता आढळल्यास अथवा योजना अंमलबजावणीतील येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करण्यासाठी सुधारणा सुचविणेसाठी टिपणी असल्यास ती कृषि संचालक (आत्मा) यांना सादर करावी. ठराविक कालावधीतील सनियंत्रण व मुल्यमापन यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन मार्फत एजन्सी नेमणे अथवा अंतर्गत व्यवस्थेच्या माध्यमातून सनियंत्रण व मुल्यमापन केले जाईल.

**सोबत - परिशिष्ट क्र १ व २**

( दशरथ तांभाळे )
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, पुणे

## परिशिष्ट- १... परंपरागत कृषि विकास योजना नवीन ८५० गटांचे प्रशिक्षणाचा तपशिल

| अ.क्र | प्रशिक्षणार्थी | मापदंड (रक्कम रु.) | अंमलबाजवणी वर्ष | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | एकुण | |
| १ | तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक / सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक | रु.१,५००/-प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ५ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रु.७,५००/- प्रति समुह २ प्रशिक्षणार्थी | १५००० | ० | ० | १५००० | हे.प्रशिक्षण डॉ.पं.दे.जै.शेती मिशन मार्फत आयोजित केले आहे.प्रवासखर्च प्रकल्प संचालक, आत्मा कार्यालयाकडून देण्यात ये |
| २ | तज्ञ प्रशिक्षक (Master Trainer) | रु.१,५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ५ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रु.७,५००/- आणि प्रवासखर्च व इतर अनुषंगीक खर्चासाठी रु.२,५००/- असे एकुण प्रति प्रशिक्षणार्थी रु.१०,०००/- | १०००० | ० | ० | १०००० | हे.प्रशिक्षण डॉ.पं.दे.जै.शेती मिशन मार्फत आयोजित करण्यात येईल आणि हे अनुदान राज्यस्तरावरुन मिशन कार्यालयास देण्यात येईल. प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्चासाठीची रक्कम रु.२,५००/- मिशन कार्यालयाने प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर लगेच द्यावे. |
| ३ | अंतर्गत नियंत्रण निरीक्षक (ICS Inspector) | रु.१,५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ३ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रु.४,५००/- आणि प्रवासखर्च व इतर अनुषंगीक खर्चासाठी रु.२,५००/- असे एकुण प्रति प्रशिक्षणार्थी रु.७,०००/- अशा एका समुहाच्या ८ प्रशिक्षणार्थीसाठी रु.५६,०००/- | ५६००० | ० | ० | ५६००० | हे.प्रशिक्षण डॉ.पं.दे.जै.शेती मिशन मार्फत आयोजित करण्यात येईल आणि हे अनुदान राज्यस्तरावरुन मिशन कार्यालयास देण्यात येईल. प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्चासाठीची रक्कम रु.२,५००/- मिशन कार्यालयाने प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर लगेच द्यावे. |
| ४ | समुह स्तरावरील शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक | रु.५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ३ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रु.१,५००/- असे एकुण १० प्रशिक्षणार्थीसाठी रु.१५,०००/- | १५००० | ० | ० | १५००० | हे प्रशिक्षण प्रकल्प संचालक, आत्मा यांनी रा किंवा कृषि विज्ञान केंद्र अथवा तत्सम संस्थेमार्फत अथवा स्वत: आयोजित करावे यासाठी मार्गदर्शनार्थ स्मार्ट्र प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालकांच्या प्रशिक्षणासाठी तयार करण्यात आलेले मोड्यु वापरावेत आणि त्याव्यतिरिक्त आवश्यक त्या विषयांचा समावेश प्रशिक्षणात करावा. |
| | | एकुण १ ते ४ | ९६००० | ० | ० | ९६००० | |

| अ.क्र | प्रशिक्षणार्थी | मापदंड (रक्कम रु.) | अंमलबाजवणी वर्ष | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | एकुण | |
| ५ | गावपातळीवरील शेतकरी | अ) एक गटाच्या (२० हे.) एक दिवसाच्या प्रशिक्षण सत्रासाठी रु.५,०००/- प्रमाणे खर्च करावे. एका गटाच्या एकुण ५ प्रशिक्षणासाठी रु.२५,०००/- प्रमाणे अनुदान उपलब्ध आहे.एकुण २५ गटाच्या ५ प्रशिक्षण सत्रासाठी रु.२५,००० X २५ = रु.६,२५,०००/- | ६२५००० | ६२५००० | ६२५००० | १८७५००० | हे प्रशिक्षण समुह स्तरावरील प्रशिक्षित तज्ञ प्रशिक्षक, बी.टी.एम./ ए.टी.एम आणि प्रशिक्षित अंतर्गत नियंत्रण निरीक्षकां मार्फत प्रकल्प संचालक, आत्मा हे गावपातळीवर आयोजित करतील,दर दोन महिन्यांनी एक या प्रमाणे वर्ष२०२३-२४,२०२४-२५ व २०२५-२६ या वर्षात ५ प्रशिक्षणे आयोजित करावेत. एका प्रशिक्षण सत्रात ५ गटातील सर्व शेतकऱ्यांच समावेश असावा. |
| | | ब) प्रशिक्षण साहित्य, प्रचार-प्रसिध्दी व शेतकरी दैनदिनी साठी प्रति समुह (कृषि आयुक्तालय स्तरावरून खर्च करण्यात येईल) | २९००० | १२५००० | १२५००० | २७९००० | |
| एकुण (१ ते ४ + ५) | | | ७५०००० | ७५०००० | ७५०००० | २२५०००० | -- |

## परिशिष्ट -२ सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजना व स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करणे

| अ.क्र. | बाब | वर्षनिहाय तरतुद (रू.) | | | | अनुदान कोणाला द्यावे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण ३ वर्षासाठी | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | |
| अ | सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजना | | | | | |
| १ | **मृदा नमुना तपासणी** - शेतक-याने सेंद्रिय शेतीसाठी समाविष्ट केलेल्या शेतातून योग्य पध्दतीने मृद नमुना काढून तपासावा. प्रत्येक वर्षी पेरणी पुर्वी सलग तीन वर्ष असे एकूण ३ नमुने तपासावेत. मृद नमुने प्राधान्यक्रमाने कृषि विभाग, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्राच्या प्रयोगशाळा मध्ये विश्लेषण करण्यात यावेत. | ९०० | ३०० | ३०० | ३०० | प्रकल्प संचालक, आत्मा यांचेस्तरावरुन शासकीय मृ चाचणी प्रयोगशाळेस अदा करण्यात यावे. |
| २ | **चर अथवा शेताच्या कडेने बांध घालणे** - स्थानिक परिस्थितीनुसार गरज असल्यास शेताच्या वरील बाजूस रासायनिक शेती करणा-या शेतक-याच्या शेतातील पाणी वाहून जैविक शेती प्रदुषित होउ नये म्हणून वरच्या बाजूने चर खोदुन किंवा बांध घालून येणारे पाणी दुसरीकडे वळवावे. (पहिल्या वर्षी फक्त) चर अथवा बांध घालणेसाठी शक्यतो गटामार्फत मशीनव्दारे (जे.सी.बी.) चर खोदुन प्रमाणीकरणाखाली नसलेल्या क्षेत्रातून वाहून येणाऱ्या पाण्यास प्रतिबंध करणेकरीता उपाययोजन करावी. | १२०० | १२०० | स्वखर्चाने | स्वखर्चाने | मजूरीची पावती/ मशीन भाडे पावती शेतकऱ्यांचे स्वयं घोषणापत्र |
| ३ | **जैविक कुंपण**- शेजारील शेतातील रसायनां च्या फवारणीचे प्रदुषण जैविक शेतीत होऊ नये म्हणून शेताच्या कडेने उंच वाढणा-या वनस्पतीची सघन पध्दतीने लागवड करावी. | ० | स्वखर्चाने | स्वखर्चाने | स्वखर्चाने | शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्या प्रती स्वाक्षरी. |
| ४ | **हिरवळीच्या खतांची पिक लागवड करणे** -कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार हिरवळीच्या खतासाठी ताग, ढैंचा इत्यादी बियाणे वापरावे. तसेच बियाणे तयार करुन पुढील वर्षी वापरावे. महाबीज अथवा राष्ट्रीय बीज निगम यांचे कडुन बियाणे उपलब्ध करून घ्यावे. | ५००० | स्वखर्चाने | २५०० | २५०० | प्रकल्प संचालक, आत्मा यांचेस्तरावरुन महाबीज अथ राष्ट्रीय बीज निगम यांना अदा करण्यात यावे. |
| ५ | **विविध कंपोस्ट पध्दतीचा अवलंब करुन सेंद्रिय घटक कुजवून खत निर्मिती करणे** - उदा. नाडेप, बायोडायनॅमिक कंपोस्ट, व्हर्मिकंपोस्ट इ. नाडेप व गांडुळ खत यूनिट शासनाच्या MGNREGA (म.ग्रा.रो. ह.यो.) व इतर योजनेतून अभिसरणाव्दारे (Convergence) बांधावे व | १९०० | स्वखर्चाने | ९५० | ९५० | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे पुरावा- शेतकऱ्याचे स्व घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |

| अ.क्र. | बाब | वर्षनिहाय तरतुद (रू.) | | | | अनुदान कोणाला द्यावे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण ३ वर्षासाठी | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | |
| | त्याचा वापर करावा किंवा बायोडायनॅमीक व इतर पध्दतीने कमीत कमी एकरी १५X६X४ फुट उंचीचे किमान ३ ढीग कंपोस्ट तयार केल्यास त्या शेतकऱ्यास या बाबीचा लाभ देता येईल. सदर लाभ हा प्रोत्साहनपर सहाय्य म्हणुन देय राहील. | | | | | |
| ६ | **बीज प्रक्रिया आणि शेतीत अन्य पध्दतीने वापरासाठी जैविक खते/ निविष्ठा** -उदा. जैवीक संघ (Liquid Consortia), रायझोबीयम ; स्फुरद विरघळणारे जिवाणु ; पोटॅश मोबीलायझींग बॅक्टेरीया, अॅझोटोबॅक्टर इ. तसेच Trichoderma सारखे जैविक बुरशी नाशके यांची खरेदी कृषि विद्यापिठ, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभागाच्या प्रयोगशाळा यांचे कडुन करावी. | २५०० | स्वखर्चाने | १२५० | १२५० | शेतकरी गटाला डीबीटी व्दारे प्रकल्प संचालक, आत्म अदा करतील.पुरावा- गटाने निविष्ठा खरेदी केल्याबाबत आणि त्याचा पुरवठा झाल्याबाबत कागदपत्रे (पुरवठ आदेश व बील).खरेदी केलेल्या निविष्ठा गटामार्फत शेतकऱ्यांना त्यांच्या क्षेत्राच्या प्रमाणात वाटप कराव्यात. |
| ७ | **शेतकऱ्याच्या शेतावर जिवामृत व बीजामृत निर्मिती व वापर** - ड्रम, कल्चर इ. खरेदी | २५०० | २५०० | स्वखर्चाने | स्वखर्चाने | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे प्रकल्प संचालक, आत्मा अद करतील.पुरावा- शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्याव क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| ८ | **पिक संरक्षणासाठी करावयाच्या उपायोजना** - किड व रोग नियंत्रणासाठी स्वनिर्मित वनस्पतीजन्य अर्क, बायोडायनॅमिक तरल किडरोधक निर्मिती व वापर | ० | स्वखर्चाने | स्वखर्चाने | स्वखर्चाने | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे पुरावा- शेतकऱ्याचे स्व घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| | **एकुण अ** | **१४०००** | **४०००** | **५०००** | **५०००** | |
| **ब** | **समुहस्तरावर (शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर) स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करणे** | १००० | १००० | ० | ० | रू. १००० प्रति हेक्टर प्रमाणे ५०० हेक्टरचे रू. ५.०० ला इतके अनुदान उपलब्ध होईल आणि त्यातुन स्वनिर्मि जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करण्यात येईल |
| | **एकुण अ + ब** | १५००० | ५००० | ५००० | ५००० | |

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
कृषि संचालक (आत्मा) यांचे कार्यालय
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
ई मेल - mahaorganicpune@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र./कृआ/पीकेव्हीवाय/मा.सू.ब./ २९ /२०२३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक :- १८ सप्टेंबर, २०२३

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)
२. प्रकल्प संचालक, आत्मा, (सर्व)

**विषय :- परंपरागत कृषि विकास योजनेच्या८५० गटांच्या मार्गदर्शक सूचना अंतर्गत प्रति शेतकरी अर्थसहाय्य क्षेत्र मर्यादा २ हेक्टर करणे बाबत...**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.कृआ/पीकेव्हीवाय/लक्षांक/१४५३५/२०२३ दि.२७/०४/२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र.कृआ/पीकेव्हीवाय/मा.सू./२२०७३/२०२३ दि.०४/०७/२०२३
३. दि.२४ व २५ ऑगस्ट २०२३च्या राज्यस्तरीय कार्यशाळेतील क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्राप्त सूचना.
४. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन नियामक मंडळ बैठक दि.३१.०८.२०२३

परंपरागत कृषि विकास योजनेची अमंलबजावणी करण्यासाठी क्र.१ अन्वये जिल्हा निहाय लक्षांक वाटप करताना सदर योजनेमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेणेसाठी क्षेत्र मर्यादा १ हे. ठेवण्यात आली होती. परंपरागत कृषि विकास योजनेच्या ८५० गटांच्या संदर्भिय क्र.२ अन्वये मार्गदर्शक सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत. संदर्भिय क्र.३ अन्वये कार्याशाळेत या मार्गदर्शक सूचनांवर चर्चा करताना प्रकल्प संचालक आत्मा यांचे कडून योजने मधील शेतकऱ्यांच्या निवडीचे अटी व निकष मध्ये नमुद केलेली प्रती शेतकरी १ हे. क्षेत्रासाठीच्या अर्थसहाय्याची कमाल मर्यादा २ हे. करणेबाबत सूचना प्राप्त झालेली होती. संदर्भिय क्र.४ च्या नियामक मंडळाच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा होऊन क्षेत्र मर्यादा कमाल २ हे. पर्यत वाढविण्या बाबत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यामुळे परंपरागत कृषि विकास योजनेच्या ८५० गटांच्या प्रती शेतकरी कमाल १ हे. क्षेत्रासाठीच्या अर्थसहाय्याची मर्याद २ हे. करण्यात येत आहे. योजनेत एका गटांचे २० हे. क्षेत्र व एका समूहाचे ५०० हे. क्षेत्र असेल यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

( दशरथ तांभाळे )
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, पुणे

प्रत :- प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला यांना माहितीस्तव.